दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

• वर्ष १७ वे • अंक १९४ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.१४ ऑक्टोबर २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# हिंमत असेल तर एकाच व्यासपीठावर समोरासमोर या, होऊन जाऊ दे

## उद्धव ठाकरेंचे शिंदेंना उघड आव्हान

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**प्रत्येक गोष्टीसाठी कोर्टात जावं लागतं. हिंमत असेल तर मैदानात या, एकाच व्यासपीठावर या समोरासमोर काय ते होऊन दाऊ देत माझी पूर्ण तयारी आहे, असं खुलं आव्हान शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिलं आहे. ते मुंबईत राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांच्या पंच्च्याहत्तरीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. छगन भुजबळ यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना उद्धव ठाकरे यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला.**



प्रत्येक गोष्टीसाठी आपल्याला कोर्टात जावं लागतंय. मैदानासाठी कोर्टात जा, उमेदवारीसाठी कोर्टात जा. अरे हिंमत असेल तर मैदानात या. माझी तर तयारी आहे. मी मैदानात उतरलेलो आहे. आम्हाला मैदान कसं मिळणार नाही याची तयारी करण्यापेक्षा एकाच व्यासपीठावर समोरासमोर येऊ आणि होऊन जाऊ देत काय व्हायचं ते, असं खुलं आव्हान उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिलं. जर छगन भुजबळ यांनी शिवसेना सोडली नसती तर ते नक्कीच मुख्यमंत्री झाले असते, असं विधानही यावेळी उद्धव ठाकरे यांनी केलं. प्रत्येकाचंच वय वाढत असतं. पण बाळासाहेब सांगायचे वयानं माणूस मोठा होत असतो. पण ज्याक्षणी तो विचारांनी थकतो तो वृद्ध होतो. त्यामुळे छगन भुजबळ असो, फारुक अब्दुल्ला असोत किंवा मग शरद पवार अजूनही तरुण मनाची माणसं आहे. नुसतं तरुण मनाचं असून चालत नाही. तुमच्या मनात जिद्द असावी लागते एक ईर्ष्या असावी लागते. ती या माणसांमध्ये आहे, असंही उद्धव ठाकरे म्हणाले.

**कार्यक्रमाला फारुक अब्दुल्ला देखील उपस्थित होते. फारुक अब्दुल्ला आणि दिवंगत शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्याशी असलेल्या मैत्रीची आठवण उद्धव ठाकरे यांनी यावेळी करुन दिली. फारुक अब्दुल्ला मला भेटले. त्यांची आणि बाळासाहेबांची चांगली मैत्री होती. ते आल्या आल्या मला म्हणाले अजिबात घाबरु नको वडिलांसारखा लढ. अशी अनेक वादळं शिवसेनेनं अंगावर घेतली आहेत. त्यावेळी अनेक मोठी वादळं देखील शिवसेनेसोबत होती. आताच्याही वादळात काँग्रेस आणि राष्ट्रवादी सारखी वादळं सोबत आहेत. वादळ निर्माण करणारे शरद पवार सोबत आहेत. वादळ असो, पाऊस असो न डगमगता उभे राहणारे सोबत असताना मी तर लढाईच्याच क्षणाची वाट पाहातोय, असं उद्धव ठाकरे म्हणाले.**

# ऋतुजा लटकेंना मोठा दिलासा

## हायकोर्टाने मुंबई मनपाला दिले राजीनामा स्वीकारण्याचे आदेश

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई महानगरपालिकेने राजीनामा न स्वीकारल्याने कोर्टात धाव घेणाऱ्या ऋतुजा लटके यांना मुंबई हायकोर्टाने मोठा दिलासा दिला आहे. उद्या सकाळी ११ वाजेपर्यंत राजीनामा स्वीकारल्याचं पत्र ऋतुजा लटके यांना द्या, असे आदेश कोर्टाने मुंबई महानगरपालिकेला दिले आहेत. त्यामुळे ऋतुजा लटके यांचा अंधेरी पूर्व विधानसभा पोटनिवडणुकीत उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेकडून लढण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



शिवसेनेचे अंधेरी पूर्व मतदारसंघातील आमदार रमेश लटके यांचे निधन झाल्याने हा मतदारसंघ रिक्त झाला होता. येथील रिक्त जागेसाठी निवडणूक आयोगाने निवडणूक जाहीर केल्यानंतर उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने या जागेवर ऋतुजा लटके यांना उमेदवारी देण्याचे निश्चित केले. मात्र मुंबई महानगरपालिकेत कर्मचारी असलेल्या ऋतुजा लटके यांचा राजीनामा मुंबई महानगरपालिकेच्या प्रशासनाने स्वीकारला नव्हता. त्यामुळे त्यांच्या उमेदवारीबाबत अनिश्चितता निर्माण झाली होती.

दरम्यान, ऋतुजा लटके यांच्या पालिकेतील राजीनाम्यावरून सुरू झालेला वाद कोर्टात पोहोचला होता. आज मुंबई हायकोर्टात या प्रकरणाची सुनावणी सुरू झाली. यावेळी लटके आणि पालिका प्रशासन अशा दोन्ही गटांकडून जोरदार युक्तिवाद झाले. त्यानंतर अखेर कोर्टाने ऋतुजा लटके यांना दिलासा देणारा निर्णय देताना मुंबई महानगपालिकेला त्यांचा राजीनामा स्वीकारण्याचे आदेश दिले. तसेच राजीनामा स्वीकारल्याचे पत्र उद्या सकाळी ११ वाजेपर्यंत देण्याची सूचनाही दिली.

# दिवाळीसाठी एसटीच्या १५०० जादा बसेस

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**दिवाळी आणि जोडून येणाऱ्या सुट्ट्यांचा कालावधी पाहता आपापल्या गावी किंवा पर्यटनासाठी जाणाऱ्या प्रवाशांच्या सोयीसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने यंदा राज्यभरात 'दिवाळी स्पेशल' १ हजार ४९४ जादा बसेस सोडण्याचा निर्णय घेतला आहे.**

दि. २१ ते ३१ ऑक्टोबर २०२२ दरम्यान या बसेस धावणार आहेत, अशी माहिती महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने यांनी दिली. मध्यवर्ती कार्यालयातील वाहतूक खात्यामार्फत दि.२९ सप्टेंबर, २०२२ रोजी सर्व विभागांना दिलेल्या आदेशानुसार जादा बसेस आरक्षणासाठी उपलब्ध करून दिल्या आहेत. सर्व प्रवाशांनी या जादा बसेसचा लाभ घ्यावा, असे आवाहनही श्री. चन्ने यांनी केले आहे.

दरम्यान, एसटी महामंडळाने 'अमृत ज्येष्ठ नागरिक' योजनेतर्गत ७५ वर्षावरील नागरिकांना एसटीच्या सर्व सेवेमधून मोफत प्रवास लागू केला आहे. तर ६५ ते ७५ वर्षादरम्यानच्या ज्येष्ठ नागरिकांना सर्व सेवांमधून ५० टक्के सवलत अनुज्ञेय करण्यात आली आहे. त्यामुळे दिवाळीच्या सणात जेष्ठ नागरिकांनीही या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. चन्ने यांनी केले आहे.

यंदा दिवाळीच्या सणात जोडून आलेल्या सुट्ट्या पाहता महामंडळाने दरवर्षी प्रमाणे नियमित बस फेऱ्या बरोबरच प्रवासी गर्दी लक्षात घेऊन १ हजार ४९४ जादा बसेस उपलब्ध करून दिल्या आहेत. प्रवाशांची वाढती गर्दी पाहून टप्प्या-टप्प्याने गाड्यांची संख्याही वाढविण्यात येणार आहे. सध्या औरंगाबाद विभागातून ३६८, मुंबई २२८, नागपूर १९५, पुणे ३५८, नाशिक २७४ व अमरावती येथून ७१ गाड्या सोडण्यात येतील, असे श्री. चन्ने यांनी सांगितले.

# नवीन पनवेल येथील डम्पिंग ग्राउंड बंद करा, अन्यथा तीव्र आंदोलन : प्रितम म्हात्रे



**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल सेक्टर १/ड नागरी वस्तीमध्ये मधोमध पनवेल महानगरपालिकेचे कचरा वर्गीकरण केंद्र आहे. या ठिकाणी नवीन पनवेल इतर परिसरातील सर्व कचरा आणला जातो आणि तिथे कचरा जमा केला जातो. यामुळे मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरत आहे. त्यानंतर त्याची विल्हेवाट त्वरीत लावणे आवश्यक आहे पण ते केले जात नाही. सदर कचरा उचलणाऱ्या ठेकेदाराकडून त्याच्या मनाप्रमाणे तो कचरा उचलला जातो त्यावर कोणाचेही अंकुश नाही. पनवेल महानगरपालिकेने ओला कचरा आणि सुका कचरा वर्गीकरण करण्यासाठी गेली काही वर्षे जनजागृती मोहीम राबविली त्यावर लाखो रुपये नागरिकांचे टॅक्स स्वरूपात आलेले खर्च केले परंतु कंत्राटदाराची ओला आणि सुका कचरा गोळा करण्याची पद्धत पाहता नक्की या कंत्राटामधून कोणाचा फायदा होणार आहे याचा प्रश्न नवीन पनवेलकरांना पडला आहे. नवीन पनवेल येथील डम्पिंग ग्राउंड बंद करा, अन्यथा तीव्र आंदोलन करावे लागेल असा इशारा प्रीतम म्हात्रे यांनी दिला आहे.

सदर प्रक्रिया दरम्यान ज्या वाहनांमधून कचरा आणला जातो ती वाहने सुस्थितीत नसल्याचेही आढळून आले आहे. काही वाहनेही सडलेल्या अवस्थेत असताना सुद्धा त्यांमधून कचरा गोळा केला जातो. सदर वाहने ही नियमाप्रमाणे संपूर्ण पॅक पाहिजेत परंतु सर्व नियम धाब्यावर बसवून कचरा उचलणाऱ्या

.../२

**या ठिकाणी पाहणी केली असता स्वच्छतेच्या बाबतीत कंत्राटदाराने किंवा पनवेल महानगरपालिकेने कोणतीही नियमावली बनवलेली नाही. या ठिकाणी काही दिवसांसाठी सुरू केलेले वर्गीकरण केंद्र हे आता पुढील तीन ते चार दिवसात महापालिकेने स्थलांतरित करून नागरिकांना मोकळा श्वास घेऊन द्यावा अन्यथा नागरिकांसोबत आम्ही तीव्र आंदोलन छेडू.**

**प्रितम जनार्दन म्हात्रे (माजी विरोधी पक्षनेते पनवेल महानगरपालिका)**

# पनवेल तालुक्यात २ लाख १० हजार मतदारांचे आधार व्हेरिफिकेशन पूर्ण

## मतदान कार्ड आधारला लिंक करावे ; तहसीलदार विजय तळेकर यांचे नागरिकांना आवाहन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**१८८ पनवेल विधानसभा मतदारसंघात आज (गुरुवार दि.१३ ऑक्टोबर) अखेरपर्यंत १ लाख ५० हजार मतदारांचे आधार व्हेरिफिकेशन पूर्ण झाले आहे. तर १९० उरण विधानसभा मतदारसंघातील पनवेल भागात २४ मतदान केंद्रे असून ६० हजार मतदारांचे आधार व्हेरिफिकेशन पूर्ण झालेले आहे. याप्रमाणे पनवेल तालुक्यात २ लाख १० हजार मतदारांचे आधार व्हेरिफिकेशन पूर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे पनवेल तालुक्यात आतापर्यंत ३० टक्के आधार जोडणीचे काम पूर्ण झालेले आहे. नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदविल्यास हे काम लवकर पूर्ण होईल. या अनुषंगाने नागरिकांनी मतदान कार्ड आधारला लिंक करावे, असे आवाहन पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांनी केले आहे.**

तहसीलदार विजय तळेकर पुढे म्हणाले, भारत निवडणुक आयोग यांच्या निर्देशांन्वये मतदार यादीमधील मतदारांची ओळख आणि छाननी सुरू आहे. सदरचा कार्यक्रम १ ऑगस्ट २०२२ पासुन संपुर्ण भारतभर सुरू झालेला आहे. १८८ पनवेल विधानसभा मतदासंघामध्ये मतदार यादीचे शुध्दीकरण करण्याच्या दृष्टीने जे मतदार आहेत त्यांचे आधार नंबर मतदार यादीस लिंक करणे किंवा आधार नंबर नसल्यास इतर ओळखपत्र मतदार यादीला लिंक करण्याचे काम सुरू आहे. मतदार यादीचे शुध्दीकरण करणे हा याचा उद्देश आहे. तरी सर्व नागरिकांना पनवेल प्रशासनाच्यावतीने विनंती करतो की जास्तीत जास्त प्रमाणात सहभाग घ्यावा.



याचबरोबर नॅशनल वोटर पोर्टल आणि वोटर हेल्पलाईन आणि इआरओ नेट अश्या वेगवेगळ्या माध्यमातून नागरिकांना आधार नंबर लिंक करता येईल. ज्या नागरिकांना ऑनलाईन लिंक करणे अवघड आहे त्यांच्यासाठी ऑफलाईन सुविधा देखील आहे. यामध्ये ६ब चा फॉर्म भरून बीएलओ मार्फत तहसीलदार कार्यालयात दिला तरी आधार लिंक होईल. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी यात सहभाग नोंदवावा असे आवाहन तहसीलदार विजय तळेकर यांनी केले आहे.

यामध्ये नागरिकांना स्वतः देखील व्हेरिफिकेशन करता येते किंवा त्यांच्या परिसरातील बीएलओ मार्फत करता येईल किंवा तहसीलदार कार्यालयातील निवडणूक विभागातून देखील करता येईल. निवडणूक आयोगाने गरुडा नावाचे मोबाईल अॅप तयार केले आहे हे कोणत्याही अँड्रॉइड फोनवर डाऊनलोड करता येते. या प मधून देखील आधार नंबर लिंक करता येतो.

मतदार यादीला आधार क्रमांक लिंक करणे ही मोहीम भारत निवडणुक आयोगाने संपूर्ण भारतभर हाती घेतलेली आहे. मतदार यादीला आधार क्रमांक जोडणीसाठी जास्तीत जास्त नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा. हे ऐच्छिक काम असले तरीदेखील मतदार यादी शुध्दीकरण करणे हा यामागील महत्वाचा उद्देश आहे. ज्याठिकाणी आधार क्रमांक नसेल त्याठिकाणी निवडणूक ओळखपत्र, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन, पासपोर्ट यासारखे ओळखीचे पुरावे अथवा कोणत्याही विभागाचे ओळखपत्र अपलोड करता येऊ शकते. त्यामुळे या मोहिमेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे.

**राहुल मुंडके, उपविभागीय अधिकारी तथा मतदान नोंदणी अधिकारी**

# नवे वीज मनोरा धोरण शेतकऱ्यांना सक्षम करणार : आ.प्रशांत ठाकूर

## भाजपकडून वीज मनोरा निर्णयाचे स्वागत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अति उच्च दाब पारेषण वाहिन्यांसाठीच्या मनोऱ्यांसाठी जमिनीचा मोबदला देण्याकरिता सुधारित धोरणास मान्यता देण्याच्या शिंदे-फडणवीस सरकारच्या निर्णयाचे प्रदेश भाजपने स्वागत केले आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यास न्याय्य मोबदला मिळून शेतकरी अधिक सक्षम होईलच, शिवाय वीजपुरवठ्याचे जाळेदेखील मजबूत होईल असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला आहे.

शिंदे-फडणवीस सरकारच्या या निर्णयाची माहिती देताना आ.प्रशांत ठाकूर म्हणाले की, वीज मनोरा आणि वाहिनी उभारण्यासाठी जमिनीचे अधिग्रहण न करता केवळ जमिनीचा वापर केला जातो. मनोरा उभारताना जमिनीच्या आणि पिकांच्या होणाऱ्या नुकसानीपोटी मोबदला



दिला जातो. आता मात्र शिंदे-फडणवीस सरकारने या धोरणात सुधारणा केल्या असून मोबदल्याची रक्कम वाढविली आहे. ६६ केव्ही किंवा त्याहून जास्त दाबाच्या अतिउच्च दाब पारेषण वाहिन्यांकरिता वापरलेल्या जमिनीच्या क्षेत्रफळाचे रेडीरेकनरमधील किंवा मागील तीन वर्षांतील जमीन खरेदी विक्रीच्या आधारे सरासरी दर यापैकी अधिक असलेल्या किमतीच्या दुप्पट दराने मोबदला दिला जाईल. सरकारच्या या निर्णयामुळे पारेषण कंपन्याचे रखडलेले विविध प्रकल्प मार्गी लागून मनोरा आणि वाहिनी उभारणी वेगाने होवून वीज निर्मितीस मदत होईल, असे ते म्हणाले.

याबरोबरच, मनोऱ्यातून जाणाऱ्या वाहिन्यांच्या पट्ट्याखालील येणाऱ्या क्षेत्रासाठी अतिरिक्त १५ टक्के तसेच रेडीरेकनर किंवा सरासरी दर यापैकी जो दर अधिक असेल त्या दराच्या १५ टक्के असा एकूण ३० टक्के मोबदला दिला जाईल. मनोऱ्याने बाधित झालेल्या जमिनीचा मोबदला थेट संबंधित शेतकरी तसेच जमीन मालकाच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल, अशी माहिती आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिली.

# जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध : ना.उदय सामंत

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींना सोबत घेवून काम करावयाचे आहे. आपण जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असून रायगड जिल्ह्यासाठी शासनाकडून सन २०२२-२३ करिता प्राप्त झालेला विकासनिधी संबंधित यंत्रणांनी विहीत कालावधीत खर्च करावा, असे प्रतिपादन राज्याचे उद्योग मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.श्री.उदय सामंत यांनी आज येथे केले.




जिल्हा नियोजन व विकास समितीची बैठक आज जिल्हा नियोजन भवन येथे पालकमंत्री ना.श्री.उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी खासदार श्रीरंग बारणे, खासदार सुनील तटकरे, सर्वश्री आमदार जयंत पाटील, बाळाराम पाटील, अनिकेत तटकरे, भरत गोगावले, प्रशांत ठाकूर, रवींद्र पाटील, आमदार कु.आदिती तटकरे, सर्वश्री आमदार महेंद्र थोरवे, महेश बालदी, महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, अलिबाग उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, रोहा उपवनसंरक्षक श्री.अप्पासाहेब निकत, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, पनवेल महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद शिंदे, जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहत्रे तसेच शासकीय विभागांचे विभाग

.../२

# खांदा वसाहतीसह नवीन पनवेलमध्ये शिवसैनिकांनी मशालीचे पूजन करून काढली मिरवणूक





**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील खांदा वसाहतीसह नवीन पनवेल मधील शिवसैनिकांनी शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख शिरिष घरत यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेची नवीन निशाणी मशाली चे पुजन करून व छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्प हार अर्पण करून मशाल प्रज्वलित करण्यात आली व मशाली ची मिरवणूक काढण्यात आली.

याप्रसंगी उपजिल्हाप्रमुख भरत पाटील, विधानसभा समन्वयक दीपक घरत, पनवेल महानगर संघटक शशिकांत डोंगरे, उपमहानगर प्रमुख रामदास गोंधळी, उपमहानगर संघटक शिवाजी शेठ दांगट, शहरप्रमुख सदानंद शिर्के यांच्यासह खांदा कॉलनी उपशहरप्रमुख दत्तात्रय महामुलकर, संपत सुवर्णा, शहर समन्वयक गणेश परब, शहर संघटक संतोष जाधव, उपशहर संघटक प्रकाश वानखेडे, संजीव गमरे, विभाग प्रमुख दौलत होटकर, सुशांत जाधव, उपविभाग प्रमुख जयराम खैरे, चंद्रगुप्त साळवी, शिवाजी बंडगर, महिला शहर संघटिका सानिका मोरे, उपशहरसंघटिका असमा खान, कार्यालय प्रमुख संदीप तोरणे सर, मोतीराम नागम, शिवसेना शाखाप्रमुख प्रसाद शिरोडकर, सुनील औटी, मगेश पवार, अतुल घुग, विठ्ठल चव्हाण,उपशाखाप्रमुख तानाजी यादव, दिपक चांदिवडे, सतीश जावकर व शिवसैनिक शिवाजी पालांडे, तानाजी घारे मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी महिला आघाडीच्या कार्यकर्त्या स्मिता घाडगे, आनंदी काटे, रशिदा शेख, अर्चना क्षीरसागर, अर्चना कुलकर्णी, आशा कनोजिया, युवासेनेचे आभेष ओंबळे, सुयश बंडगर, सचिन महामुलकर, सिद्धेश मोकल, सौरव महामुलकर, प्रितम यादव, युगेश कुरणे तर नवीन पनवेल येथे उपमहानगर प्रमुख किरण तावदारे, नविन पनवेल शहरप्रमुख यतिन देशमुख आणि महिला शहर संघटिका सौ. अपूर्वा प्रभू यांच्यासह नविन पनवेल विभागप्रमुख किरण सोनावणे, बिपीन झुरे, उपविभाग प्रमुख राजेश वैंगणकर, अविनाश गव्हाणकर, संजय भोसले, महिला उपतालुका संघटिका सुगंधा शिंदे, उपशहरसंघटिका मालती पिंगळा, विभाग संघटिका वैशाली थळी , कार्यालय प्रमुख जनार्दन जाधव काका, शिवसेना शाखाप्रमुख शाम खडकबाण, विनोद शिंदे, प्रवीण चोनकर, विकास पोवळे, देवेंद्र शिंदे, अमित चौगुले, सत्यवान गायकर, उपशाखाप्रमुख जनार्दन तांबोळी, शिवसैनिक शिवाजी पालांडे, शाम तळेकर, महिला आघाडीच्या शाखा संघटिका सेजल खडकबाण, अलका सानप, अर्चना पाटील, सायली शिंदे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# नगराज शेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूलमध्ये वैद्यकीय शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण बोरी येथील साई संस्थेच्या नगराजशेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूलमध्ये जिल्हा प्रशासन आणि रायगड जिल्हा आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आणि इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय उरण यांच्या सौजन्याने माता सुरक्षीत तर घर सुरक्षीत अभियांतर्गत वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

पूर्णपणे मोफत असणाऱ्या या वैद्यकीय शिबिरांतर्गत माता, स्तनदा माता, किशोर वयीनमुली यांना विशेष मार्गदर्शन करण्यात येवून त्यांच्या समस्यांचे निरसन करण्यात येणार आहे. त्याबरोबर त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात येणार आहे. या तपसणी अंतर्गत रक्त दाब, ब्लड शुगर (मधुमेह), सीबीसी, थायरॉईड फंक्शनल टेस्ट, लिव्हर फंक्शनल टेस्ट (एलएफटी-लिव्हर), लिपीड प्रोफाईल (चॉलेस्टेरॉल), रीनल फंक्शनल टेस्ट (आरएफटी-किडनी), आर.ए.फॅक्टर,आदिची तपासणी करण्यात येणार आहे.

या साठी इंदिरा ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.बाबासो कळेलआणि त्यांची सर्व टीम आणि या क्षेत्रांतील तज्ञ डॉक्टरउपस्थित राहणार आहेत, सदरचे शिबीर हे नगराज शेठ सीबीएससी इंटर नॅशनल स्कूलउरण बोरी येथे मंगळवर दिनांक १८ अक्टोबर २०२२ रोजी सकाळी १० ते १२:३० व दुपारी १:३० ते ४ वाजेपर्यंत असे दोन सत्रात होणारआहे या शिबिराचा माता-भगिनींनी मोठया प्रमाणात लाभ घ्यावा असे आव्हान साई संस्थेचे अध्यक्ष नरसू पाटील व उरण येथील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.बाबासो काळेल यांनी केले आहे.

# पनवेल येथून इसम बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तु घरी निघुन जा मी नंतर येतो असे सांगून गेलेला पती परत न आल्याने तो हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. स्नेहील केशवराव वासनिक (वय ३८ वर्षे, रा. करंजाडे) असे या इसमाचे नाव असून त्याची उंची ५ फुट ५ ईच, रंग सावळा, केस काळे, डोळे- काळे, नाक सरळ, चेहरा उभट, बांधा मध्यम, अंगात नेसुस ऑफ व्हाइट रंगाचा शर्ट निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट व पायात काळ्या रंगाची चप्पल घातलेली आहे. त्याच्या कपाळाला डाव्या बाजुला जखमेचा व्रण असून त्याला मराठी हिंदी भाषा बोलता येते. सदर इसमाबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी क्र.०२२-२७४५२३३३ किंवा पोहवा सचिन जाधव यांच्याशी संपर्क साधा.


## जाहीर नोटीस

या नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल मे.एस एफ कंन्स्ट्रक्शन व मे.अभिषेक इंटरप्रायझेस ऑफिस पत्ता : शॉप नं.०१, भूखंड क्र.५७, सेक्टर-११, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड हे खालील वर्णनाचा भूखंड ''त्रिमुर्ती मल्हार सहकारी गृहनिर्माण संस्था'' (नियोजित) च्या नावे हस्तांतरण करून घेत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| नोड | भूखंड क्र. | सेक्टर | क्षेत्र |
|---|---|---|---|
| करंजाडे | २९ | ०३ | ४९९.९६ चौ.मी. |

तरी कोणाही व्यक्तीचे / व्यक्ती किंवा आर्थिक संस्थेचे भूखंड संदर्भात कुठल्याही प्रकारचे दावा, हरकती, जसे बोजा, दान, गहाण, सरकारी, निमसरकारी, कंपनी, बक्षिस, भाडेपट्टा, वारसा, हक्क, लोन किंवा इतर काही असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवससाच्या आत कागदपत्रासोबत खालील पत्यावर समक्ष भेटावे. मुदतीनंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाही किंवा हस्तांतरण झाल्यानंतर ही आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि.१३/१०/२०२२

**सही/-**
**ॲड.सौ.रेखा होवाळे**
**शॉप नं.१३, प्रभात सेंटर,**
**सि.बी.डी.बेलापूर**


# आ.जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली उरण मध्ये सभेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । उरण**

शेकाप पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या मध्ये समन्वय साधण्यासाठी शेकापचे ज्येष्ठ नेते तथा आमदार भाई जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली उरण जेएनपीए ( टाऊनशिप) येथील मल्टीप्लेक्स हॉल मध्ये शुक्रवारी दि १४ /१०/२०२२ रोजी सकाळी ठिक १०-३० वा. सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

उरण तालुक्या मध्ये आज ही शेकापक्षाचे वर्चस्व आहे. त्यामुळे आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून शेकापची रणनिती ठरविण्यासाठी तसेच शेकाप पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या मध्ये समन्वय साधण्यासाठी शेकापचे ज्येष्ठ नेते तथा आमदार भाई जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली उरण जेएनपीए टाऊनशिप येथील मल्टीप्लेक्स हॉल मध्ये शुक्रवारी दि १४/१०/२०२२ रोजी सकाळी ठिक १०-३० वाजता जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे.या सभेसाठी उपस्थित राहणाऱ्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांना आमदार जयंत पाटील, आमदार बाळाराम पाटील,शेकापक्षाचे जिल्हा चिटणीस तथा रायगड जिल्हा परिषद उपाध्यक्ष आस्वाद पाटील, पनवेल महानगर पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे,तालुका चिटणीस मेघनाथ तांडेल हे मार्गदर्शन करणार आहेत.तरी शेकापच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन उरण तालुका शेकाप कडून करण्यात येत आहे.

# रायगड जिल्ह्यात भविष्यात अनेक उद्योग धंदे येणार : ना. उदय सामंत रोह्याला धावती भेट

**दै.रायगड नगरी । रोहा**

रायगड जिल्ह्यात भविष्यात अनेक उद्योग धंदे येणार आहेत. या उद्योगांचा आपण स्वागतच केले पाहिजे. या नव्या उद्योगांच्या माध्यमातून स्थानिक तरुण बेरोजगार यांच्या हाताला काम मिळेल यासाठी आपण नक्कीच प्रयत्नशील असून भविष्यात संपूर्ण रायगड जिल्हा विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विचारांचा असेल असा आत्मविश्वास राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. उदय सामंत यांनी बुधवारी रात्री रोह्याला धावती भेट दिली त्याप्रसंगी व्यक्त केला.



अलिबाग येथे गुरुवारी होणाऱ्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकी पूर्वी बुधवारी रात्री पालकमंत्री ना. उदय सामंत यांनी रोह्याला धावती भेट दिली. धाटाव एमआयडीसीतील सुदर्शन कंपनीत त्यांनी स्थानिक कार्यकर्ते व कंपनी अधिकाऱ्यांशी चर्चा केली. यावेळी शिवसेना शिंदे गटाचे तालुका प्रमुख ॲड. मनोज कुमार शिंदे, उप तालुका प्रमुख संदेश मोरे, विजय बोरकर, विकास पाटील, सूर्यकांत मोरे, कु. सायली सदावर्ते आदी असंख्य शिवसैनिकांनी त्यांचे जंगी स्वागत केले.

पत्रकारांशी वार्तालाप करताना ना. उदय सामंत म्हणाले की, रोह्यात एमआयडीसी आहे त्याचप्रमाणे या ठिकाणी मुंबई - गोवा महामार्ग असल्यामुळे लहान मोठे अपघात घडत असतात. अपघाता नंतर रुग्णांवर तातडीने उपचार व्हावं यासाठी मुख्यमंत्री ना. शिंदे यांच्या सहकार्याने शासकीय निधी अथवा सी.एस. आर. फंडातून महामार्ग व एमआयडीसीला लागून नवीन सुसज्ज हॉस्पिटल बांधणार असल्याचे सांगत धाटाव एमआयडीसीत लवकरच शासकीय विश्राम गृह बांधणार आहोत असे ते म्हणाले. या भेट दरम्यान आपण रोहा तालुका व रायगड जिल्हायात बाळासाहेबांच्या शिवसेनेची निश्चितीच ताकद वाढविणार असल्याची माहिती पालकमंत्री ना. उदय सामंत यांनी दिली.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.अशोककुमार एम.जैन रा.फ्लॅट नं.१०३, राज टॉवर, प्लॉट नं.२१, सेक्टर-१९, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१० यांनी मुळ मालक कै.गोखल्या उर्फ गोकुळ वालक्या जोशी (मयत) चे वारस १) श्री.आत्माराम गोखल्या उर्फ गोकुळ जोशी, २) श्री.दत्तात्रेय गोखल्या उर्फ गोकुळ जोशी, ३) श्रीमती.अश्विनी चंद्रकांत जोशी, ४) कु.अविरथ चंद्रकांत जोशी, ५) कु.प्रतिक्षा चंद्रकांत जोशी सर्व रा.ओवे पेठ, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड यांच्या मालकीची मिळकत सिडकोने १२.५ टक्के योजनेंतर्गत संपादीत करण्यात आलेली असून सदरहू संपादनापोटी खालील भूखंड मिळालेला असून सदरहू भूखंड आमचे अशिल हे सिडको त्रिपक्षीय करारान्वये हस्तांतरीत करून घेणार आहेत. सदरहू भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**नोड ओवे, ता.पनवेल, जि.रायगड**
**सिडको फाईल नं.२४९/ओवे**

| नोड | सेक्टर नं. | प्लॉट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| ओवे | ३३ | २९ | १०० चौ.मी. |

तरी वरील वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी कोणा व्यक्ती, इसम, कंपनी यांची कोणत्याही दान, गहाण, तारण, लिन, चार्ज, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी, ती कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसात आम्हाला आमचे खालील पत्यावर समक्ष येवून भेटून त्याबाबत मुळ कागदपत्रानिशी वरील नमूद केलेल्या पत्यावर लेखी हरकत नोंदवून तशी लेखी पोहोच घ्यावी.

उपरोक्त १५ दिवसात जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास आमचे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे
दि.१३/१०/२०२२

**सही/-**
**ॲड.सौ.रेखा होवाळे**
**शॉप नं.१३, सेक्टर १ ए,**
**प्रभात सेंटर, सीबीडी बेलापूर,**
**नवी मुंबई-४००६१४**
**मो.नं.९८१९६३०६३२**



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे : नानोशी, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत १) श्री.बळीराम हिरा पाटील, २) श्री.कृष्णा हिरा पाटील, ३) हनुमान हिरा पाटील, ४) सौ.रुपाली योगेश पवार, ५) श्री.राहुल वामन पाटील, ६) चांगुणाबाई हिरा पाटील यांचेकडून खरेदीखताने कायमस्वरुपी खरेदी करण्याचे योजिले आहे.

**भूखंडाचे वर्णन**
**मौजे : नानोशी, ता.पनवेल, जि.रायगड**

| गट क्र. | गट क्रमांकाचा उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| ९४ | २ | ०-३८-७० पो.ख.०-०६-८० | ८.३७ |

वर नमूद मिळकतीस अनुसरुन कुणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, भागीदारी इत्यादींचा कुठल्याही प्रकारचा दान, गहाण, तारण, खरेदी, बयाणा, कर्ज, पोटगी, अन्न, वस्त्र, निवारा, वहिवाट, बक्षिस इत्यादीद्वारे मालकी अथवा इतर कसलाही हक्कहितसंबंध असल्यास, सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपले हक्क हितसंबंधाच्या स्वरुपासहीत प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे खाली नमूद पत्यावर आपल्या लेखी हरकती रजिस्टर पोस्टाद्वारे अथवा समक्ष दाखल कराव्यात. सदर १५ दिवसांचे आत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचे खरेदीखत व अनुषंगिक दस्त कायदेशीरपणे पूर्ण करतील व त्यानंतर मागावून आलेल्या कसल्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत.

दि.१३/१०/२०२२
ठिकाण : पनवेल

**सही/-**
**ॲड.शरद जाधव**
**तळमजला, रॅयल प्राईड बिल्डींग,**
**भूखंड क्र.११३, मिडल क्लास को.ऑप.**
**हौ.सोसायटी, पनवेल-४१०२०६**
**ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९८२०६३७१७५**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## नवीन पनवेल येथील डम्पिंग ग्राउंड बंद करा, अन्यथा तीव्र आंदोलन : प्रितम म्हात्रे

ठेकेदाराची मनमानी सुरू आहे. पनवेल महानगरपालिकेने ठेकेदाराला संबंधित विषयात नोटीस काढून सर्व गाड्यांचे ऑडिट करावे अशी मागणी प्रितम म्हात्रे यांनी केली आहे. रस्त्यांमधून प्रवास करत असताना बऱ्याच वेळा कचरा हा रस्त्यावर पडला जातो त्यावरून दुचाकी स्वार पडल्याच्या सुद्धा घटना घडलेल्या आहेत. या कचऱ्याला मोठ्या प्रमाणात दुर्गंधी सुटत असल्याने नागरिकांचा जीव मेटाकुटीला आला आहे. दुर्गंधीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. बरीच वाहने ही जुनी झाल्यामुळे कंत्राटदाराने सदर प्लॉटवर सडलेल्या परिस्थितीमध्ये टाकून दिलेले आहेत ज्यामुळे त्या प्लॉटचा दुरुपयोग सुद्धा होत आहे. तसेच त्या भूखंडातील परिसरात ठिकठिकाणी पाणी साचलेले आहे ज्यामध्ये डेंग्यूचे मच्छर वाढून संपूर्ण परिसरामध्ये डेंग्यूचा फैलाव होण्यास त्यामुळे मदत होत आहे. अतिक्रमण विभागामधून उचलले गेलेले बरेचसे सामान या भूखंडावर पसरलेले आहे ज्यामध्ये उंदीर आणि घुशी यांचा उपद्रव वाढला आहे. अशाप्रकारे अनेक प्रकारच्या समस्या त्या भूखंडावर आहेत. त्याचे दुष्परिणाम त्या भूखंडाच्या चारही बाजूने राहणाऱ्या लोकवस्ती मधील नागरिकांना होत आहेत.

पनवेल महानगरपालिकेला हजारो रुपयांचा टॅक्स भरून नागरिकांना अशा प्रकारच्या गलिच्छ वातावरणात राहावे लागत आहे अशी खंत तेथील जेष्ठ नागरिकांनी बोलून दाखवली. यावेळी शेकापचे प्रभाकर कांबळे, बबन विश्वकर्मा, रमाकांत गरुडे यांच्यासह आजूबाजूच्या परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध : ना.उदय सामंत

व कार्यालय प्रमुख उपस्थित होते. या बैठकीत मागील बैठकीचे इतिवृत्त व त्यावरील कार्यवाहीच्या अहवालास समितीमार्फत मान्यता देण्यात आली. सन २०२२-२३ चा प्रारुप आराखडा व सन २०२१-२२ अंतर्गत दि. जानेवारी २०२२ अखेरील खर्चाचा आढावा सादरीकरणाच्या माध्यमातून समितीसमोर मांडण्यात आला. लोकप्रतिनिधी व समिती सदस्यांमार्फत प्रलंबित विषयांचा निपटारा होण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने केलेली अंमलबजावणी व अंतिम टप्प्यात असलेल्या विविध उपाययोजना त्वरीत पूर्णत्वास न्याव्यात, अशा सूचना पालकमंत्री तथा जिल्हा नियोजन समितीचे ना.श्री.उदय सामंत यांनी दिल्या.

पालकमंत्री ना.श्री.उदय सामंत यांनी उपस्थित लोकप्रतिनिधींनी मांडलेल्या विविध विषयांवर जिल्हा प्रशासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना यावेळी दिले.

जिल्हा वार्षिक नियोजनच्या निधीतून सर्वांनी मिळून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देवू या, यासाठी सर्व पदाधिकारी आणि अधिकारी यांचे योगदान निश्चितच महत्वाचे राहणार आहे, असेही पालकमंत्री ना.श्री.उदय सामंत म्हणाले.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी पालकमंत्री ना.श्री.उदय सामंत व उपस्थित लोकप्रतिनिधींनी सूचित केलेल्या बाबींबाबत तातडीने संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेवून तात्काळ आवश्यक ती कार्यवाही केली जाईल, असे सांगितले.

जिल्हा नियोजन अधिकारी यांनी यावेळी उपस्थित समिती सदस्यांना जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीबद्दल माहिती देताना सांगितले की, जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२१-२२ करिता रु.२७५.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला असून प्राप्त निधीपैकी रु.२७५.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यापैकी सप्टेंबर २०२२ अखेर रु.१८१.६१ कोटी इतका निधी खर्च करण्यात आला असून खर्चाची टक्केवारी ६६.०० टक्के इतकी आहे.

बैठकीच्या शेवटी लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांनी आपापसातील योग्य त्या समन्वयाने हा निधी जिल्ह्यातील विकास कामांवर विहीत कालावधीत खर्च करावा. या कामांच्या माध्यमातून जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान उंचाविण्याच्या दृष्टीने कामे व्हावीत, अशी अपेक्षा पालकमंत्री ना.श्री.उदय सामंत यांनी व्यक्त करून जिल्ह्याच्या विकासासाठी सर्वांचे सहकार्य मिळेल, असा विश्वास व्यक्त केला व सर्व उपस्थितांचे आभार मानले.


## जाहीर नोटीस

टेनन्सी अपिल क्र.१३/२०२२

प्रति,
१) अनंता घारु शेलवळे
रा.चेवणे, ता.कर्जत, जि.रायगड
२) पमाबाई उर्फ पदाबाई रघुनाथ घावट
रा.नारीवली, ता.मुरबाड, जि.ठाणे
३) विठाबाई बाबु चौधरी
रा.धसई, ता.मुरबाड, जि.ठाणे अपिलार्थी
विरुद्ध
१) जयश्री जगन्नाथ गोडबोले
२) पुरुषोत्तम जगन्नाथ गोडबोले
रा.चेवणे, ता.कर्जत, जि.रायगड सामनेवाले

तमाम जनतेस तसेच सामनेवाले/प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : चेवणे, ता.कर्जत, जि.रायगड येथील तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण कर्जत यांचे कडील कुळवहिवाट ३२ ग दावा क्र.१६/२०२१ दि.२४/०२/२०२२ रोजी दिलेल्या आदेशाविरुद्ध अपिलार्थी / वादी यांनी या न्यायालयात प्रस्तुतचे अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये दि.२४/०२/२०२२ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी दि.२२/११/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी कर्जत, उपविभाग कर्जत, हायड्रो कॉलनी दहिवली, कर्जत, जि.रायगड येथे निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कर्जत, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| गाव | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| मौजे चेवणे, ता.कर्जत, जि.रायगड | ९२/१ | ०-२९-७० पो.ख.०-१०-१० | ३.१२ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.

ठिकाण : कर्जत
दिनांक : १२/१०/२०२२

**सही/-**
**उपविभागीय अधिकारी**
**कर्जत उपविभाग कर्जतकरिता**



## जाहीर नोटीस

टेनन्सी अपिल क्र.१२/२०२२

प्रति,
१) अनंता घारु शेलवळे
रा.चेवणे, ता.कर्जत, जि.रायगड
२) पमाबाई उर्फ पदाबाई रघुनाथ घावट
रा.नारीवली, ता.मुरबाड, जि.ठाणे
३) विठाबाई बाबु चौधरी
रा.धसई, ता.मुरबाड, जि.ठाणे अपिलार्थी
विरुद्ध
१) शकुंतला विष्णू पालांडे
रा.चेवणे, ता.कर्जत, जि.रायगड सामनेवाले

तमाम जनतेस तसेच सामनेवाले/प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : चेवणे, ता.कर्जत, जि.रायगड येथील तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण कर्जत यांचे कडील कुळवहिवाट ३२ ग दावा क्र.१५/२०२१ दि.२४/०२/२०२२ रोजी दिलेल्या आदेशाविरुद्ध अपिलार्थी / वादी यांनी या न्यायालयात प्रस्तुतचे अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये दि.२९/०४/२०२२ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी दि.२२/११/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी कर्जत, उपविभाग कर्जत, हायड्रो कॉलनी दहिवली, कर्जत, जि.रायगड येथे निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कर्जत, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| गाव | सर्व्हे नं./ | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| मौजे चेवणे, ता.कर्जत, जि.रायगड | ८७ | ०-१६-०० | ०.२८ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.

ठिकाण : कर्जत
दिनांक : १२/१०/२०२२

**सही/-**
**उपविभागीय अधिकारी**
**कर्जत उपविभाग कर्जतकरिता**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## राष्ट्रीय टपाल सप्ताह साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतीय डाक विभाग ९ ते १३ ऑक्टोबर दरम्यान राष्ट्रीय टपाल सप्ताह साजरा करत आहे. या सप्ताहातील दिनांक ११ ऑक्टोंबर रोजी राष्ट्रीय फिलॅटेली दिवस नवी मुंबई डाक विभागा मार्फत उत्साहात साजरा करण्यात आला. राष्ट्रीय फिलॅटेली दिनाचे औचित्य साधत नवी मुंबई डाक विभागाने फिलॅटेलीवर आधारीत विवीध उपक्रम राबविले. पनवेल हेड पोस्ट ऑफिस येथे पोस्टेज स्टॅम्प प्रदर्शन भरवण्यात आले.

या प्रदर्शनास संत साई साईबाबा शाळा, विसपुते हायस्कूल, एमएनआर हायस्कूल आणि सेंट जोसेफ हायस्कूल मधील सुमारे १२०० विद्यार्थ्यांनी भेट दिली. फिलॅटेलिस्ट श्री प्रबीर के आर बोस यांचा वैयक्तिक फिलॅटेली स्टॅम्प संग्रह या प्रदर्शनात प्रदर्शित करण्यात आला. यावेळी चर्चासत्र, प्रश्नमंजुषा, निबंध लेखन, स्टॅम्प डिझायनिंग स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या संपूर्ण कार्यक्रमास नितीन एस येवला, वरिष्ठ अधीक्षक डाकघर, नवी मुंबई डाक विभाग, वाशी यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

## कॉम्प्लेक्समधील घरफोडीमुळे रहिवाशी भयभीत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील सुकापुर येथील ओम शिवा कॉम्प्लेक्समध्ये दोन घरफोड्या झाल्याने रहिवाशी भयभीत झाले आहे.

ओम शिवा कॉम्प्लेक्स येथे राहणाऱ्या सुनिता सदाशिव पाटणकर (रूम नंबर १०१) व पंडित डेरे (रूम नंबर २०२ ए विंग) या दोन्ही घरांमध्ये कोणीही नसल्याचे पाहून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश करून मोठ्या प्रमाणात मुद्देमाल घेऊन पोबारा केला आहे. या घटनेची माहिती खान्देश्वर पोलिसांना मिळताच गुन्हे शाखेची पथके यांनी घटना स्थळी दाखल झाल होते. गेल्या काही दिवसांपासून पनवेल परिसरात घरफोडीचे सत्र वाढत असल्याचे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# निवडणुकीत नेतेमंडळीची मिठास वाणी, मात्र वर्षानुवर्षे पालीकरांच्या नशिबी गढूळ व दूषित पाणी

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सरकारी काम आणि बारा महिने थांब या म्हणीचा प्रत्येय पालीकर जनतेला अनुभवयास मिळाला आहे, पिढ्यानपिढ्या येथील जनतेला दूषित व गढूळ पाणी प्यावे लागते आहे. निवडणुकीत विविध पक्षाची नेतेमंडळी ची मिठास वाणीतुन शुद्ध पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्याची आश्वासने व विश्वास देतात खरे, मात्र वर्षानुवर्षे पालीकरांच्या नशिबी गढूळ व दूषित पाणी च असल्याची बाब प्रकर्षाने समोर येतेय. महाराष्ट्रातील अष्टविनायक तीर्थक्षेत्र व सुधागड तालुक्याचे मुख्यालय असलेल्या पाली शहराला येथील अंबा नदीतून पाणीपुरवठा केला जातो. शहरातील सांडपाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता ते थेट अंबा नदीपात्रात सोडले जात आहे. त्यामुळे हे प्रदूषित पाणी पिणारे नागरिक व भाविकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.



येथील सांडपाण्यावर प्रक्रिया करणारा कोणताच प्रकल्प पालीत उपलब्ध नाही. तसेच तब्बल ३७ कोटींची शुद्धपाणी योजना देखील लालफितीत अडकलेली आहे. परिणामी भाविक व नागरिकांना नाईलाजाने हे प्रदूषित पाणी वा-परावे लागत आहे. या प्रदूषित पाण्याने नागरिक व भाविकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

आत्ता पर्यंत नळाच्या पाण्यातून साप, बेडूक, शंखशिंपले व मासे आदी प्राणी आले आहेत. याबरोबरच शेवाळ, चिखल हे नेहमीच येत असते. आजूबाजूच्या कारखान्यांतून प्रदूषित पाणी देखील अंबा नदीमध्ये सोडले जाते. असे प्रदूषित व घाण पाणी नाईलाजाने लोकांना वापरावे लागते आहे. अनेक नागरिक प्रदूषित पाणी पिण्यापेक्षा कूपनलिका व विहीरीचे पाणी पिण्यावर भर देत आहेत. बहुतांश जण विकतचे बाटलीबंद पाणी पितात. नियमित पाणीपट्टी भरून देखील लोकांना असे प्रदूषित पाणी मिळत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. प्रशासनाने प्रदूषित पाण्यापासून आमची सुटका करावी असा सुर नागरिकांमधून उमटत आहे. या दूषित पाण्याचा परिणाम येथील मासे व जलचर प्राण्यांवर देखील होत आहे.

नुकतेच पाली ग्रामपंचायतीचे रूपांतर नगरपंचायतमध्ये झाले आहे. नवनिर्वाचित नगराध्यक्षा गीता पालरेचा यांनी लवकरच शुद्धपाणी योजना कार्यान्वित करू असे आश्वासन दिले आहे. शिवाय नगरपंचायत निवडणूक प्रचारात सर्वच पक्षाचे नेते तसेच स्थानिक मंत्री, आमदार व खासदारांनी देखील पाली शुद्धपाणी योजना कार्यान्वित करू असे आश्वासन दिले होते. त्यामुळे ही आश्वासने नक्की प्रत्यक्षात केव्हा उतरणार या आशेवर पालीकर नागरिक आहेत.

# महिलांमध्ये चोरीची दहशत व छेडछाड करणाऱ्या आरोपीला अटक

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यामध्ये महिलांमध्ये दहशत व छेडछाड करून अंगावरील दाग दागिने उतरवून घेऊन पोबारा करणाऱ्या अज्ञात चोरट्याला काल सायंकाळी साडेसात वाजता तळा पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी सुरेश पवार यांनी शिताफरीने पकडून अटक केली आहे.

सदर इसमाने तालुक्यात दोन महिने उच्छाद मांडला होता अशीच घटना तळा तालुक्यातील चोरीवली येथील फिर्यादी महिला निर्मला चंद्रकांत जाधव वय वर्ष ६५ तालुका तळा बागाची नदी या भागात कामा निमित्त गेली असताना अज्ञात चोरटा तिथे येऊन पुढे म्हसळा बाजू कडे जाऊन परत फिरून फिर्यादी महिलेस तुला कोठे जायचे आहे अशी चौकशी करून हाताला धरून रोडच्या बाजूला नेवून कानातील ५ ग्रॅम वजनाचे २ कुंड्या व ४ ग्रॅम वजनाचे कान चैन जबरदस्तीने काढून घेऊन साधारण अंदाजे ४५०००/-किमतीचा दागिन्याचा पोबारा केला होता सदर घटना ४/८/२०२२ रोजी सकाळी ११.३०वा. घडली होती सदर घटनेची नोंद करण्यात आली होती तिचा मुलगा मुंबईहून येऊन त्यांनी काल अटक केल्यानंतर गु.र.तक्रार नं.९४/ २०२२ भा.द.वि.क.३९२ लावण्यात आला असून पोलिस निरीक्षक गोविंद ओमासे यांच्या मार्गदर्शना खाली पो.ह.७६९मनोहर पाटील पुढील तपास करीत आहेत.

सदर चोरट्यांनी तालुक्यात विविध ठिकाणी केलेल्या चोरीची कबुली दिली असून म्हसळा तालुक्यातील वरवठणे येथील निलेश कांबळे असे नांव तपासा अंती समजले या अज्ञात चोरट्यांनी दहशत निर्माण केली होती त्यामुळे महिलांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते सदर अज्ञात चोरट्याला सुरेश पवार पोलीस यांनी शिताफरीने पकडल्यामुळे तालुक्यातील नागरिकांकडून अभिनंदन केले जात आहे.

# शिरढोण येथे गळफास घेऊन इसमाची आत्महत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मानसिक तणावाखाली येऊन एका इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना तालुक्यातील शिरढोण येथील श्री बालाजी हॉटेल आणि लॉज येथे घडली आहे. दीपक कटबू (वय ४०, रा. मुंब्रा) याने मानसिक तणावातून श्री बालाजी हॉटेल आणि लॉज मधील रूम नं १०४ येथे पंख्याला नॉयलॉनच्या दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. याबाबतची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# म्हसळा नगर पंचायतीने स्वच्छ सर्वेक्षणमध्ये महाराष्ट्रातून प्राप्त केले ३२ वे मानांकन

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

सन २०१५ मध्ये म्हसळा नगर पंचायतीची स्थापना झाली आणि म्हसळा शहरातील नागरिकांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या हाती एकहाती सत्ता दिली. रायगडचे खासदार सुनिल तटकरे आणि माजी पालकमंत्री यांनी म्हसळा शहराचा विकास हाच ध्यास हाच श्वास असा वचन देत शहराच्या सर्वांगीण विकासासाठी लाखो रुपयांचा निधी उप-लब्ध करून नगर पंचायतीचे आजी, माजी लोकप्रतिनिधी आणि अधिकारी,कर्मचारी यांचे मदतीने शहराचा खऱ्या अर्थाने कायापालट केला आहे. यातच अधिक भर पडली ती म्हणजे केंद्र शासनाच्या स्वच्छ सर्वेक्षण अभियान २०२२ मध्ये म्हसळा नगरपंचायतीने भाग घेत स्पर्धेत महाराष्ट्रातून ३२ वे मानांकन प्राप्त केले तर पश्चिम भारत विभागातून २७९ नगरपालिकामधून ११२ व्या क्रमांकाचे मानांकन प्राप्त केले असल्याची माहिती मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांनी देताना सांगितले. त्याच बरोबर यंदाच्या स्वच्छ भारत अभियानात कौतुकास्पद बाब म्हणजे म्हसळा शहरास हागणदारी मुक्त स्पर्धेमध्ये ओडीएफ ++( डबल प्लस) मानांकन प्राप्त झाले असल्याने म्हसळा नगर पंचायतीचे कामगिरी मध्ये आणखी एक यशाचा तुरा रोवला गेला आहे.

मागील वर्षाचा मानांकनाचा निकाल पाहता म्हसळा नगरपंचायतीने १०३ व्या स्थानावरून ३२ व्या स्थानावर झेप घेतली आहे.म्हसळा शहर कचराकुंडी मुक्त आणि हागणदारी मुक्त झाला असल्याने शहरातील प्रत्येक नागरिकाला याचा सार्थ अभिमान वाटत आहे. स्वच्छ सर्वेक्षण अभियानात स्थानीक रहिवासी, व्यापारी तसेच सार्वजनिक ठिकाणी नियमित स्वच्छता, सार्वजनिक शौचालय स्वच्छता व व्यवस्थापन, डिजिटल सेवा सुविधा, शहराचे सुशोभीकरण, घनकचरा व मैला सांडपाणी व्यवस्थापन तसेच शहरातील विविध आस्थापना व नागरिक यांचा सहभाग व जनजागृती, थ्री आर प्रणाली, शंभर टक्के कचरा संकलन तसेच नाले व पाण्याचे स्त्रोत, विंधन विहिरी स्वच्छता व व्यवस्थापन अशा अनेक स्वच्छता विषय घटकांचा समावेश स्पर्धेमध्ये केला होता असे मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांनी माहिती देताना हे सर्व घटक शहराच्या विकासाला पोषक असे ठरले याद्वारेच संपूर्ण शहराचा शाश्वत विकास होण्यास मदत झाली आहे.

या सर्व घटकांच्या आधारे म्हसळा शहराचे मुल्यांकन होऊन हे मानांकने प्राप्त झाले असल्याचे मुख्याधिकारी यांनी स्पष्ट केले. मानांकन प्राप्त करण्यास म्हसळा नगरपंचायतीचे नगराध्यक्ष असहल कादिरी, उपनगराध्यक्ष सुनिल शेडगे गटनेते संजय कर्णिक विषय समिती सभापती सर्व नगरसेवक, मुख्याधिकारी मनोज उकिर्डे, स्वच्छ सर्वेक्षण शहर समन्वयक प्रियंका चव्हाण, नगरपंचायत कर्मचारी, सफाई कामगार आणि शहरातील नागरिकांचे अनमोल योगदान मिळाले आहे. या पुढील सर्वेक्षणात म्हसळा नगरपंचायतीस प्रथम दहा मानांकनामध्ये स्थान प्राप्त होण्यासाठी यशस्वी प्रयत्न करू आणि म्हसळा शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी प्रयत्न केला जाईल असे आश्वासन नगराध्यक्ष असहल कादिरी, मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांनी दिले आहे.

## जाहीर सूचना

या सुचनेद्वारे तमाम जनतेस सुचित करण्यात येत आहे की, श्रीमती. स्वाती चंद्रगौडा पाटील यांच्या मालकीचा व ताबेकब्जांतील फ्लॅट क्र. ७, पहिला मजला, डी विंग, कस्तुरी को. ऑप. हौसिंग सोसायटी लि., प्लॉट नं. ४५३, तक्का, ता. पनवेल, जि. रायगड, नवी मुंबई - ४१०२०६. ज्याचे क्षेत्रफळ ८३० बिल्टअप एरिया याप्रमाणे मिळकत आहे. सदरहू फ्लॅट संदर्भित मुळ दस्त, १. करारनामा (अग्रिमेंट ऑफ सेल), हे मे चरिष्मा बिल्डर्स आणि श्री. एल.एन. वासवानी आणि श्रीमती शिल्पा एन. वासवानी यांच्यासोबत दिनांक निष्पादीत २७/०९/१९९३ रोजी करण्यात आले. दस्तऐवज क्रमांक पनवेल / १९५७ /१९९३ या दस्तानुसार नोंदणीकृत केलेले आहे. दिनांक १६/१०/१९९३, सदरहू फ्लॅटचे मुळ दस्ताऐवज पनवेल तक्का येथून गहाळ झाले आहेत. त्या संदर्भात दिनांक २०/०८/२०२२ रोजी गहाळ / हरविलेले असून सदरची तकार ०१/१०/२०२२ रोजी पनवेल शहर पोलिस ठाण्यात नोंदवली असून तिचा तक्रार क्रमांक. ०२२/२०२२ आहे. वरील संदर्भित मालमत्तेवर किंवा तिचा काही भाग विक्री, गहाणखत, बक्षीसपत्र, बदली, देखभाल,वारसा, ताबा, भाडेपट्टा, भाडेकरार, पोट भाडेकरार, हस्तांतरण इ. तरीही याद्वारे विनंती केली जाते की, सदर नोटीस जाहिर झाल्यानंतर १० दिवसांच्या आंत दोन्ही पक्षांना संपर्क साधावा. तरी सदरचे मुळ दस्तऐवज कुणाला सापडल्यास त्यांनी उपरोक्त पत्यावर अथवा ९०२८७८९७९६ या क्रमांकाशी संपर्क साधावा.

दि.११/१०/२०२२
ठिकाण : पनवेल

**सही /**
**ॲड.योगेश एस. भाष्टे**
**मुंबई उच्च न्यायालय**
**फ्लॅट नं.१८, मारूती अपार्टमेंट, लाईन आळी, शिवाजी रोड, पनवेल - ४१०२०६.**
**मोब. नं. ८८९८१२१९७१**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली शेतजमीन मिळकत तीचे विद्यमान मालक / कब्जेदार श्री.हेमंत मुकूंद म्हात्रे, रा.चिरनेर, ता.उरण, जि.रायगड यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : चिरनेर, ता.उरण, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| मौजे | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| चिरनेर | २७६ | ११ | ००.१२.७०<br>पो.ख. ००.०१.००<br>एकूण ००.१३.७० | ०.५० |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदला बदल व येणे जाणेसाठी अथवा वहिवाटी वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात पोस्टाने किंवा स्वतःहून हजर होवून आमचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसात कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभात होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही हरकत घेतल्यास ती हरकत आमच्यावर अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.१३/१०/२०२२
स्थळ : उरण

**सही/-**
**ॲड.उदय प्रकाश मोकल**
**अे-६३, रुम नं.१०, सेक्टर-१, जेएनपीटी कॉलनी, द्रोणागिरी नोड, ता.उरण, जि.रायगड**
**मो.नं.९०८२९११९१३**

CIDCO WE MAKE CITIES

# CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA Ltd.
# शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित

## PUBLIC NOTICE

**Town Planning Scheme, NAINA No. 1**
**(Akurli, Belavali, Chikhale)**
**(As per Rule 26(2) of the Maharashtra Town Planning Schemes Rules. 1974)**
**No. TPS-1/NAINA/Form-7/2022/E-155112**

Whereas, the draft Town Planning Scheme, NAINA No. 1 (Akurli, Belavali, Chikhale) has been sanctioned by the Vice Chairman & Managing Director, CIDCO under sub-Section (2) of section 68 of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter, referred to as the 'said Act') vide Notification No. CIDCO/NAINA/TPS-1/2018 dated 21st September 2018, in exercise of the powers delegated to him by the Urban Development Department vide Notification No.TPS-1817/973/CR-103/17/UD-13, dated 13th September, 2017. The said Notification is published in Maharashtra Government Gazette, Extraordinary; Part-II dated 24th September 2018.

And whereas, the Government of Maharashtra in Urban Development Department has appointed Shri S. V. Surve, retired Deputy Director of Town Planning as the Arbitrator for the said sanctioned Draft Scheme vide Notification No. TPS-1718/4354/CR-223/18/UD-12 dated 23rd October 2018 under sub-section (1) of Section 72 of the said Act.

And whereas, the Arbitrator, in accordance with Rule No.13 (1) of Maharashtra Town Planning Schemes Rules, 1974 (hereinafter referred to as the 'said Rules'), has declared by publishing notice in the Maharashtra Government Gazette on 15th November 2018 that, he has commenced the duties as Arbitrator in respect of the Town Planning Scheme, NAINA No.1 (Chipale, Vihighar, Devad, Bhokarpada, Belavali, Sangade) from 15th November 2018.

And whereas, the Arbitrator has prepared and drawn up the Preliminary Town Planning Scheme, NAINA No. 1 which has been sanctioned by the State Government vide Urban Development Department Notification No. TPS-1219/1865/CR-108/19/UD- 12 dated 3rd September 2021 and has come into force w.e.f. 11th February 2020.

Now, therefore, the undersigned informs that the Director of Town Planning, Maharashtra State Pune will, on an application of an owner of any final plot included in the preliminary scheme and on payment of required fees, issue a certificate in Form 7 (as provided under rule no. 26 (2) of the Maharashtra Town Planning Schemes Rules. 1974) specifying the area and boundaries of a reconstituted plot, the nature of the tenure of, and of the owner's title to, such a plot and the name of the person to whom the plot has been allotted under the preliminary scheme.

**Chief Planner (NAINA)**
**S.P.A. N.A.I.N.A.**

## जाहीर सूचना

**नगर रचना परियोजना नैना क्र.१,**
**(आकुर्ली, बेलवली, चिखले)**
**(महाराष्ट्र नगर रचना परियोजना नियम १९७४ च्या नियम क्र.२६(२) अन्वये)**
**क्र. नरयो-१/नैना/नमुना-७/२०२२/E-१५५११२**

ज्याअर्थी, प्रारुप नगर रचना परियोजना नैना क्र.१, (आकुर्ली, बेलवली, चिखले) ही उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, यांनी, त्यांना नगर विकास विभागाने दि. १३ सप्टेंबर २०१७ च्या अधिसूचना क्र. टीपीएस/१८१७/९७३/प्र.क्र.१०३/१७/नवि-१३, अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन त्यांची अधिसूचना क्र. सिडको/नैना/नरयो-१/२०१८ दिनांक २१ सप्टेंबर २०१८ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ६८ (२) (यापुढे उक्त अधिनियम असा उल्लेख केलेला) मंजूर केली आहे. ही अधिसूचना दिनांक २४ सप्टेंबर २०१८ च्या महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-२ असाधारण मध्ये प्रसिद्ध झालेली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोटकलमच्या पोटकलम (१) अन्वये राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने निवृत्त उपसंचालक, नगर रचना श्री. सु. व. सुर्वे यांची दिनांक २३ ऑक्टोबर २०१८ च्या अधिसूचना क्र. टीपीएस-१७१८/४३५४/प्र.क्र.२२३/१८/नवि-१२, अन्वये वर उल्लेखलेल्या मंजूर प्रारुप परीयोजनेसाठी लवाद म्हणून नेमणूक केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, सदर लवाद यांनी महाराष्ट्र नगर रचना योजना नियम, १९७४ च्या नियम १३(१) (यापुढे उक्त नियम असा उल्लेख केलेला) नुसार दिनांक १५ नोव्हेंबर २०१८ च्या महाराष्ट्र शासन राजपत्रातील सूचनेअन्वये नगर रचना परीयोजना, नैना क्र. १, (आकुर्ली, बेलवली, चिखले) चे लवाद म्हणून दिनांक १५ नोव्हेंबर २०१८ पासून याबाबतची कर्तव्ये पार पाडण्यास सुरुवात केली आहे.

आणि ज्या अर्थी लवाद यांनी प्रारंभिक नगर रचना परीयोजना नैना क्र. २,(चिपळे, विहीघर, देवद, भोकरपाडा, बेलवली, सांगडे) विहित मुदतीमध्ये दिनांक २० जुन २०१९ रोजी तयार केलेली आहे व ती आता शासनाने नगर विकास विभाग अधिसूचना क्र. नरयो-१२१९/१८६५/प्र.क्र १०८/१९/नवि- १२ दिनांक ३ सप्टेंबर २०१९ अन्वये मंजूर केलेली असून ती दिनांक ११ फेब्रुवारी २०२० पासून अंमलात आलेली आहे.

आता, तदनंतर, निम्नस्वाक्षरीकार माहितीस्तव कळवीत आहेत कि, संचालक, नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, पुणे यांस अंतिम योजनेत अंतर्भूत असलेल्या कोणत्याही भूखंडाच्या मालकाचा अर्ज आल्यानंतर आणि आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर, पुनर्रचना केलेल्या भूखंडाचे क्षेत्रफळ व सीमा, जमीनधारणेचे व अशा भूखंडावरील मालकाच्या हक्काने स्वरूप आणि अंतिम योजनेनुसार जिच्या नावे त्या भुखंडाचे नियत वाटप झाले त्या व्यक्तीचे नाव, यांचा विनिर्देश करणारे नमुना ७ (महाराष्ट्र नगर रचना परियोजना नियम १९७४ च्या नियम क्र.२६(२) अन्वये) मधील प्रमाणपत्र अदा करतील.

**मुख्य नियोजनकार (नैना)**
**विशेष नियोजन प्राधिकरण, नैना**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
CIDCO/PR/283/2022-23

# संक्षिप्त...

## खोपटा रस्त्यावर गाडीला अपघात

**दै.रायगड नगरी । उरण**

खोपटा पुल ते कोप्रोली रस्त्यावरुन जाणाऱ्या सत्यम डेअरी गाडीला अपघात झाल्याची घटना गुरुवारी ( दि१३) सकाळी ४ च्या सुमारास घडली आहे. या अपघातात चालक थोडक्यात बचावला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार सत्यम डेअरी ही गाडी कोप्रोली गावाकडून दुध घेऊन उरण शहराकडे गुरुवारी ( दि१३) सकाळी ४ च्या सुमारास जात होती. खोपटा बस स्थानका जवळील रस्त्यावरुन जाणाऱ्या माल वाहू टेलरने अचानक खचलेल्या साईट पट्टीवर ब्रेक लावल्याने सत्यम डेअरी गाडीची जोरदार धडक ट्रेलरला बसली. या झालेल्या अपघातात सत्यम डेअरी गाडीचे नूकसान झाले असून चालक थोडक्यात बचावला आहे.

## हिराकोट तलाव सुशोभिकरण कामांचे उदय सामंत यांच्या हस्ते लोकार्पण संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हा नियोजन समिती रायगड सन २०२१-२२ अंतर्गत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत हिराकोट तलाव येथे करण्यात आलेल्या रिटेनिंग वॉल चे बांधकाम, रेलिंग बसविणे आणि उद्यान विकसित करणे, या कामांचा लोकार्पण सोहळा पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते आज संपन्न झाला.

यावेळी आमदार भरत गोगावले, जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, मुख्याधिकारी अंगाई साळुंखे व इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजित हरवडे यांनी केले.

ऐतिहासिक हिराकोट तलावाच्या संवर्धन व जतनाचे महत्वपूर्ण काम जिल्हा नियोजन समितीमार्फत करण्यात आले. अलिबाग शहरास सरखेल कान्होजी आंग्रे यांचा ऐतिहासिक वारसा असून तो जतन करण्याची जबाबदारी पार पाडण्याचे भाग्य लाभले, याचे समाधान असल्याची भावना मुख्याधिकारी अंगाई साळुंखे यांनी व्यक्त केली.


### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# रोहा स्थानकाजवळ रेल्वे रुळ ओलांडताना वाढत्या अपघातात अनेकांचा मृत्यू

## पादचारी पुल आणि संरक्षण भिंतीसाठी मनसेने दिले निवेदन

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा स्थानकाजवळ रेल्वे रुळ ओलांडताना होणाऱ्या अपघातांची संख्या वाढते आहे, अनेकांचा त्यामध्ये मृत्यू तर शेकडो जनावरांचेही बळी गेले आहेत, बुधवारी सायंकाळी या ठिकाणी एका गरीब महिलेला रेल्वे रुळ ओलांडताना झालेल्या अपघातात आपले प्राण गमवावे लागले. यानंतर रोहा तालुका मनसेने मध्यरेल्वे प्रशासनाला निवेदन दिले असून पादचारी पुलासह संरक्षक भिंत बांधण्याची मागणी केली आहे.



रोहा रेल्वे स्थानका जवळ रेल्वे रुळ ओलांडताना आजवर अनेक अपघात झाले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने महिलांसह अनेकांचे अपघात होत त्यांना आपल्या जिवाला मुकावे लागले आहे. यासोबतच स्थानक परिसरालगत असणाऱ्या रेल्वे रुळांच्या बाजूला संरक्षण भिंत नसल्यामुळे शेकडो मुक्या जनावरांचे हकनाक बळी जात आहेत.रोहा तालुक्यातील पायाभूत सुविधांचे बाबतीत आजवर सर्वच लोकप्रतिनिधी हे अनभिज्ञ असल्यामुळे अश्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. मनसेने या निवेदनाद्वारे रोहा स्थानक परिसरात तातडीने संरक्षण भिंत उभारत पिंगळसई - धामणसई विभागातील १६ गावांसह नजीकच्या नवीन वसाहती मधील नागरिकांसाठी स्वतंत्र पादचारी पुल उभारण्याची मागणी केली आहे. रोहा रेल्वे स्थानक उप प्रबंधक आशिष सिंह व रेल्वे पोलीस उपनिरिक्षक आर के यादव यांनी हे निवेदन स्विकारले. स्थानिक रहिवाशी व मनसेचे उपतालुकाध्यक्ष सुरज मुटके यांचे वतीने हे निवेदन देताना जिल्हा चिटणीस अमोल पेणकर, तालुकाध्यक्ष अक्षय रटाटे,शहराध्यक्ष मंगेश रावकर,रितेश किर्तने ,सुमित कांबळे, अक्षय सावंत आदी उपस्थित होते.

रोहा मध्ये १९८६ मध्ये रेल्वे सेवा सुरु झाली.मात्र अपुऱ्या रेल्वे गाड्या यासोबतच नागरिकांची सुरक्षितता व सुविधा यादृष्टीने रेल्वे ने कोणत्याही सुविधा न दिल्यामुळे आता ही रेल्वे सेवा जीवघेणी व धोकादायक ठरत आहे.रोहा स्थानकाच्या एका बाजूला रोहा -अष्टमीशहर तर दुसऱ्या बाजूला पिंगळसई, वांदोली, मढाली, सोनगाव, गावठाण, धामणसई, मुठवली, मालसई, इंदरदेव, या प्रमुख गावंसह आदिवासी वाड्या वस्त्या आहेत. या पुर्णतः ग्रामीण बहुल भागातील नागरिक आपल्या सर्वच गरजा भागवण्यासाठी रोहा शहरावर अवलंबून आहेत. आझादी का अमृतमहोत्सव या यावर्षी सर्वत्र जोरदार साजरा झाला मात्र आजही या भागात शासनाची लालपरी एस टी पोहोचलेली नाही. यामुळे काही राजकीय पक्षांचे कार्यकर्ते , ठेकेदार वगळता बहुतांशी नागरिकांना आजही पायपीट करत रोहा शहर गाठावे लागत आहे. यांच्या पारंपरिक पायवाटेच्या जागीच रोहा रेल्वे स्थानक व रेल्वे रुळांचे जाळे आज पसरले आहे. मात्र आता हे रेल्वे रुळांचे जाळे व त्यावरून भरधाव धावणाऱ्या गाड्या या ग्रामिणांना जीवघेण्या ठरत आहेत. आजवर कोणत्याही लोकप्रतिनिधींनी या समस्येकडे कधी गांभीर्याने लक्ष घालत त्या सोडवण्याचे प्रयत्न केले नाहीत. रेल्वे मार्गाचे दुपदरीकरण व विद्युतीकरण झाल्यामुळे वाढलेली गाड्यांची संख्या व त्यांचा वेग यामुळे आज या ठिकाणी वारंवार अपघात होत आहेत. आता तरी निद्रिस्त असलेल्या मध्य रेल्वे प्रशासन व झोपेचे सोंग घेतलेल्या लोकप्रतिनिधींनी जागे होत या ग्रामीण भागातील नागरिकांचे सुरक्षिततेसाठी येथे पादचारी पुल व संरक्षण भित बांधावी असे निवेदनात म्हटले आहे.

> बुधवारी रेल्वे गाडीने धडक दिल्यामुळे महिलेला जागीच आपले प्राण गमवावे लागले. याठिकाणी जर पादचारी पुल असते तर आज तिचे व यापूर्वी अपघातात प्राण गमावलेल्या अनेकांचे जीव वाचले असते. संपूर्ण रेल्वे स्थानक परिसराला संरक्षण भिंत असती तर चारा शोधत रेल्वे रुळावर येणारे अनेक मुक्या पाळीव प्राण्यांचे बळी गेले नसते. निवेदनाची दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.
>
> **- अमोल पेणकर, जिल्हा चिटणीस मनसे**

## अल्पवयीन मुलीस चार महिन्यांची गरोदर करणाऱ्या नराधमाच्या शोधात पोलीस

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अल्पवयीन मुलीला चार महिन्यांची गरोदर ठेवल्याप्रकरणी एका नराधमाच्या शोधात पोलीस आहेत.

पीडीत बालिका १५ वर्षांची असून ती चार महिन्यांची गरोदर झाल्यानंतर तीच्या आईला याबाबत समजले. नेरुळमध्ये राहणारी व मुलांच्या पालन पोषणासाठी घरकाम करणा-या आईने याबाबतची तक्रार नेरुळ पोलीसांना दिल्यावर पोलीसांनी या घटनेची नोंद केली. पोलिसांनी या घटनेची शोध घेतल्यानंतर पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील फणसवाडी (वलप) गावात राहणाऱ्या या नराधमाने बालिकेचे दोन वर्षे शोषण केल्याचे पोलिसांना समजले. त्यांनंतर तात्काळ हा गुन्हा पनवेल तालुका पोलीसांकडे तपासासाठी वर्ग करण्यात आला. ह्या गंभीर प्रकरणाची नोंद घेत वरिष्ठ पोलीस निरिक्षक रविंद्र दौंडकर यांनी या प्रकरणी पोलीस निरिक्षक अंकुश खेडकर व सहाय्यक पोलीस निरिक्षक अंबिका अंधारे यांचे पथक नेमून याबाबत तपास करण्याची सूचना दिली. पनवेल तालुक्यातील वलप गावातील फणसवाडी या गाव-ातील एका तरुणाच्या संपर्कात गेल्या दोन वर्षांपासून संबंधित पिडीताचे शोषण केले जात असल्याचे तीच्या आईला समजल्यावर या घटनेला वाचा फुटली. पनवेल तालुका पोलीस या प्रकरणातील संशयीत आरोपीचा शोध घेत आहेत.

## १ नोव्हेंबर पासून नदीपात्रातील गाळ काढण्याची महाड पूर निवारण समितीची मागणी

**दै.रायगड नगरी । महाड**

गतवर्षी २२ व २३ जुलै रोजी आलेल्या महाप्रलयात महाड शहरासह नजिकच्या शंभर गावांतील झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या नुकसानीचे पार्श्वभूमीवर तालुक्याच्या विविध भागांतून येणाऱ्या नदीपात्रातील गाळ काढण्याच्या कामाला चालू वर्षी एक नोव्हेंबरपासून सुरुवात व्हावी अशी मागणी महाड पूर निवारण समिती मार्फत करण्यात आली असून या कामात स्थानिक प्रशासनामार्फत सर्वतोपरी सहकार्य देण्यात येईल अशी ग्वाही महाड च्या प्रांताधिकारी श्रीमती प्रतिमा पुदलवाड यांनी पूर निवारण समितीच्या सदस्यांसमवेत झालेल्या बैठकीदरम्यान दिली आहे.

जुलै २०२१ च्या महाप्रलयानंतर चालू वर्षी जानेवारी महिन्यापासून सावित्री, गांधारी, काळ नदीपात्रातील गाळ काढण्याच्या कामाला झालेल्या सुरवातीचा लाभ महाडकरांना चालूवर्षी अनुभवता आला. दरवर्षी होणाऱ्या सरासरी ३२०० मिलीमीटर पावसा एवढाच पाऊस पडूनदेखील यावर्षी शहरात महापुराचे पाणी शिरले नव्हते याचे श्रेय पूर निवारण समितीच्या माध्यमातून झालेल्या कामाला नागरिकांकडून दिले जात असून पुढील पाच वर्षांच्या काळात शासनाने घोषित केलेल्या सावित्री नदीच्या उगमापासून बाणकोट खाडीपर्यंतचा नदीपात्रातील गाळ काढण्याच्या योजनेची कार्यवाही चालूवर्षी १ नोव्हेंबरपासून कोणत्याही परिस्थितीत सुरू करावी अशी मागणी महाड पुर निवारण समितीच्या सदस्यांनी या बैठकीत केली. सावित्री, काळ, गांधारी नदीपात्रासह तालुक्याच्या विविध भागांतून घेत असलेल्या छोट्या नद्यांमधील ही सफाई तसेच गांधारी पुलानजीकच्या कामांबाबत व शासनाकडे मंजूर असलेल्या नवीन दादली पुलाची निर्मिती व अन्य कामांबाबतही यावेळी समितीच्या सदस्यांनी प्रांताधिकारी श्रीमती पुदल-वाड यांच्याशी चर्चा केली. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत दादली पूल तसेच गांधारी पुलाच्या नवीन प्रस्तावाबाबत करण्यात आलेले प्रस्ताव मंजुरीच्या अंतिम टप्प्यात असून या संदर्भात एक महिन्याच्या आत शासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर याबाबतची निविदा प्रक्रिया करण्यात येईल अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता श्री उलागडे यांनी पूर निवारण समितीच्या सदस्यांसमवेत केलेल्या चर्चेदरम्यान दिल्याने चालूवर्षी महाडवासीयांना आवश्यक असलेले नदीपात्रातील गाळ काढण्याचे काम तातडीने सुरू होईल असा विश्वास व्यक्त होत आहे.

# आष्टे लॉजिस्टीक मधील गुडविल कंटेनर सर्व्हिसेस मधील सर्व्हेअर कामगारांना भरघोस पगारवाढ

## जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्या माध्यमातून पगारवाढ कराराचा धडाका

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आष्टे लॉजिस्टीक मधील गुडविल कंटेनर सर्व्हिसेस मधील सर्व्हेअरचा काम करणा-या कामगारांना भरघोस पगारवाढीचा करार जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्या माध्यमातून करण्यात आला.



आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कामगार नेते जितेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्या माध्यमातून आष्टे लॉजिस्टीकमधील गुडविल कंटेनर सर्व्हिसेस मधील कामगारांचा पगारवाढ व इतर सोयीसुविधांचा करार रायगड जिल्हा कामगार उपायुक्त प्रदीप पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांच्या दालनात पार पडला. तीन वर्षांच्या झालेल्या करारानुसार कामगारांना १० हजार रुपयांची पगार वाढ करण्यात आली त्यामध्ये पहिल्या वर्षी प्रती महिना चार हजार रुपये त्यानंतर नंतर दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी प्रत्येकी ०३ हजार रुपयांची पगारवाढीचा समावेश आहे. तसेच ०२ लाख रुपयांपर्यंत मेडीक्लेम पॉलिसी, सुट्ट्या, बोनस अशा अनेक सोयी सुविधांचा समावेश आहे. सदर करारावर संघटनेच्या वतीने अध्यक्ष जितेंद्र घरत, सचिव विनायक मुंबईकर, कार्यालयीन सचिव समिरा चव्हाण, संघटक रविंद्र कोरडे यांनी स्वाक्षरी केली तर व्यवस्थापनाच्या वतीने विपीन पिटालिया व कांतिलाल पाटील यांनी स्वाक्षरी केली. सहा महिन्यापासून प्रलंबित असणारा या कराराबाबत मध्यस्थी करण्यासंदर्भात संघटनेने सहाय्यक कामगार उपायुक्त शितल कुलकर्णी यांच्याकडे रीतसर पत्र देवून विनंती केली. त्यामध्ये शितल कुलकर्णी यांनी मोलाची भूमिका घेवून संघटना व व्यवस्थापनाला मोलाचे मार्गदर्शन करून सदर करार हा पूर्ण केला. याप्रसंगी कामगार प्रतिनिधी योगेश गायकर, मदन पाटील, सचिन कुलकर्णी, प्रशांत पाटील, अतुल नाईक आदी उपस्थित होते.

# ठाकरे गट जिल्हा प्रमुख मनोहर भोईर यांना शिंदे गटातील कोअर कमिटी सदस्य रुपेश पाटील यांचा जोरदार धक्का

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उद्धव ठाकरे यांच्या समोर आम्ही हलणार नाही आणि एक ही पदाधिकारी कुठे गेला नाहीय आणि जाणार नाही अशा वलग्ना जिल्हा प्रमुख मनोहर भोईर यांनी पक्षप्रमुखांच्या समक्ष केल्यामात्र काही तासांतच त्यांना धक्का मिळाला आहे. उलवा शहराचे शहर प्रमुख मनोज घरत यांच्यासह महिला शहर प्रमुख, शाखा प्रमुख यांनी युवासेनेचे कोअर कमिटी सदस्य रुपेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिंदे गटात पक्षप्रवेश केला आहे.



राज्यभर उद्धव गट आणि शिंदे गट ह्यात जोरदार लढाई सुरू असताना उद्धव गटातून उरण विधानसभेच्या सर्व पदाधिकारी यांना मातोश्रीवर बोलाविण्यात आले, उद्धव ठाकरे यांच्या समोर आम्ही हलणार नाही आणि एक ही पदाधिकारी कुठे गेला नाहीय आणि जाणार नाही अशा वलग्ना जिल्हा प्रमुख मनोहर भोईर यांनी पक्षप्रमुखांच्या समक्ष केल्या तर शिवसैनिकांनी घोषणा देऊन टाळ्या वाजवून ह्याचे स्वागत केले मात्र काही तासांतच मनोहर भोईर यांना धक्का मिळाला आहे. युवासेनेचे कोअर कमिटी सदस्य रुपेश पाटील यांनी उरण विधानसभेचे उलवा शहराचे शहर प्रमुख मनोज घरत, महिला शहर प्रमुख स्नेहल घरत, महिला शाखा प्रमुख व शिवसेना शाखा प्रमुख यांना थेट शिंदे गटात घेऊन उद्धव गटाला धक्का दिला आणि मनोहर भोईर यांच्या नेतृत्वाला खिंडार पाडले आहे.

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार श्रीकांत शिंदे यांनी मनोज घरत आणि पदाधिकारी यांचे स्वागत केले आणि अभिनंदन केले. या पक्ष प्रवेशावेळी उरण विधानसभा उपजिल्हा प्रमुख अतुल भगत, खारघर शहर प्रमुख प्रसाद परब उपस्थित होते. तसेच काही दिवसांत प्रत्येक आठवड्यात उरण मधून पक्ष प्रवेश घेण्याचे रुपेश पाटील यांनी मुख्यमंत्री साहेबांच्या समोर जाहीर केले.

# सूर निरागस हो समूहाचा सहावा वर्धापन दिन संपन्न, बहारदार सांगितिक कार्यक्रमाचे आयोजन




**दै.रायगड नगरी । पनवेल**

सूर निरागस हो या समूहाला सहा वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सुरांच्या सुरेल अमृतधारा हा बहारदार सांगीतिक कार्यक्रम संपन्न झाला. पनवेल येथील फडके नाट्यगृहात संपन्न झालेल्या या कार्यक्रमाला भारतरत्न बिस्मिल्ला खाँ यांचे शिष्य पं. शैलेश भागवत, कोकणरत्न राजाभाऊ शेंबेकर तसेच रत्नागिरी येथील खल्वायन संस्थेचे श्रीनिवास जोशी असे मान्यवर अतिथी म्हणून उपस्थित होते.

या कार्यक्रमात धनंजय जोशी, नांदेड व मुग्धा गावकर, गोवा आणि कस्तुरी देशपांडे, ठाणे या कलाकारांनी नाट्यपदे, अभंग, भक्तिगीते आदी गीतप्रकारांचे उत्तम सादरीकरण केले. त्याना वरद सोहनी यानी ऑर्गन, रामकृष्ण करंबेळकर यानी तबला, सूरज गांधळी यानी पखवाज तर समीर कर्वे यानी तालवाद्यांची साथ केली. पूर्वा पेठे यांनी अभ्यासपूर्ण निवेदनाने कार्यक्रम रंगतदार केला. 'सूर निरागस हो' या संस्थेच्या किरण बापट, चंद्रकांत व जयश्री ताम्हनकर, चंद्रकांत मने, अविनाश व अनुश्री देव यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

# शासन आणि बांधकाम व्यावसायिकांनी परस्पर सहकार्याने काम केल्यास गृहनिर्माण क्षेत्राला उर्जितावस्था मिळेल : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई परिसरातील पुनर्विकासाच्या कामांचा क्लस्टरच्या माध्यमातून विकास करण्यासाठी शासन आणि बांधकाम व्यावसायिकांनी परस्पर सहकार्याने काम केल्यास गृहनिर्माण क्षेत्राला उर्जितावस्था मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. यासाठी शासनामार्फत आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. शासनाने विविध सवलती दिल्याने बांधकाम व्यावसायिकांनी सर्वसामान्यांसाठी परवडणाऱ्या दरात घरे उपलब्ध करून द्यावीत, असे आवाहन त्यांनी केले.

कॉन्फेडरेशन ऑफ रिअल इस्टेट डेव्हलपर्स असोसिएशन ऑफ इंडिया - महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्ट्री (क्रेडाई-एमसीएचआय) यांच्यावतीने वांद्रे कुर्ला संकुलातील एमएमआरडीए मैदानात आयोजित मालमत्ताविषयक प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव भूषण गगराणी, एमएमआरडीएचे आयुक्त एसआरव्ही श्रीनिवास, क्रेडाई-एमसीएचआयचे अध्यक्ष बोमन इराणी, सचिव धवल अजमेरा आदी उपस्थित होते. १३ ते १६ ऑक्टोबर या काळात हे प्रदर्शन सुरू असणार आहे.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, वाढत्या नागरीकरणामुळे आणि रोजगारानिमित्त मोठ्या शहरात स्थलांतरित होणाऱ्या सर्वसामान्यांसाठी चांगल्या दर्जाचे आणि परवडणारे घर असावे हे स्वप्न असते. त्यांच्यासाठी मालमत्ता विषयक प्रदर्शन उपयुक्त ठरते. सर्वसामान्यांना स्वस्तात घर उपलब्ध व्हावे यासाठी राज्य शासनाने बांधकाम क्षेत्राला विविध सवलती दिल्या आहेत. या सवलतींमुळे बांधकाम क्षेत्राला संजीवनी प्राप्त झाली असून त्याचा लाभ 'क्रेडाई'सारख्या संस्थांनी सर्वसामान्यांना करून द्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मुंबई शहरातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी शासनाने विविध पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर भर दिला आहे. येत्या काळात मुंबईसह उर्वरित महाराष्ट्रात प्रवास करणे सुकर होणार आहे. मुंबईतील रस्ते खड्डेमुक्त करण्यासाठी सिमेंट काँक्रीटचे बनविण्यात येणार आहेत. मुंबई महानगर क्षेत्रात मेट्रोचे ३३७ किमीचे जाळे उभारण्याचे काम सुरू आहे. यामुळे रस्त्यावरील वाहतूक कमी होऊन प्रवास सुलभ होईल आणि याचा लाभ बांधकाम क्षेत्राला होईल असा विश्वास मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी व्यक्त केला. मागील तीन महिन्यात पेट्रोल-डिझेलच्या दरात कपात, शेतकऱ्यांना एनडीआरएफच्या निकषांपेक्षा अधिक मदत आदींसह ७२ मोठे निर्णय घेतल्याचा उल्लेख मुख्यमंत्र्यांनी यावेळी केला. सर्वसामान्यांच्या जीवनात चांगला बदल व्हावा यासाठी शासन सकारात्मक निर्णय घेऊन त्याच्या अंमलबजावणीवर भर देत असल्याचे ते म्हणाले. शेतीनंतर बांधकाम हे सर्वाधिक रोजगार उपलब्ध करणारे क्षेत्र असल्याने याच्या विकासासाठी शासन निश्चित मदत करेल, बांधकाम व्यावसायिकांनी सर्वसामान्यांच्या आवाक्यातील घरे तयार करावीत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## पनवेल शहरातून मोबाईलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

घराच्या अर्धवट उघड्या दरवाज्याची सेफ्टी चैन काढून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून घरात असलेला सॅमसंग गॅलॅक्सि कंपनीचा मोबाईल चोरून नेल्याची घटना शहरा-तील नर्मदा कॉम्प्लेक्स येथे घडली आहे.

वसंत काजरोळकर यांच्या घराचा अर्धवट उघड्या दरवाज्याची सेफ्टी चैन काढून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून घरात असलेला सॅमसंग गॅलॅक्सि कंपनीचा मोबाईल ज्याची किंमत २३ हजार इतकी आहे तो चोरून नेला आहे याबातची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.